निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

छत्रपती संभाजीनगर
पाने : ४
किंमत : २.००
वर्ष : १५ वे
अंक : ८४ वा
बुधवार -२८ मे २०२५

E-mail:dainikattachexpress@gmail.com | E-Paper : http://attachexpress.in | Post Regd.No. ABD-441/2024-26 | RNI.No.MAH/MAR2011/39247

## मोदींचा भुजमधून पाकिस्तानला इशारा

### सुखाचं आयुष्य जगा, भाकरी खा, अन्यथा माझी गोळी आहेच

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** गुजरातच्या भुजमधून पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाकिस्तानला इशारा दिला आहे. तर दुसरीकडे भारताच्या ऑपरेशन सिंदुरनंतर पाकिस्तान चांगलाच घाबरला आहे. पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी भारतासोबत चर्चेची तयारी दर्शवली आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी पाकिस्तानला पुन्हा एकदा इशारा दिला आहे.

सुखाचं आयुष्य जगा, भाकरी खा. अन्यथा माझी गोळी आहेच, असा इशारा भुजमधून मोदींनी पाकिस्तानला दिला आहे. पहलगाममध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यानंतर भारतानं पाकिस्तानमध्ये घुसत

#### काय म्हणाले शाहबाज शरीफ?

काश्मीर, सिंधू पाणी करार आणि दहशतवादासह सर्व मुद्द्यांवर भारतासोबत चर्चा करण्याची तयारी दर्शवली आहे. इराणचे अध्यक्ष मसूद पझाकियान यांच्यासोबत संयुक्त पत्रकार परिषदेत पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी हे विधान केलं. आम्हाला काश्मीर प्रश्न आणि पाणी प्रश्नासह सर्व वाद चर्चेद्वारे सोडवायचे आहेत. आम्ही आमच्या शेजाऱ्यासोबत व्यापार आणि दहशतवादविरोधी मुद्द्यांवर चर्चा करण्यास देखील तयार आहोत असं ते म्हणाले आहेत.

दहशतवाद्यांना धडा शिकवला. तसंच दहशतवाद्यांची तळं देखील भारतानं उद्ध्वस्त केली होती. दरम्यान यानंतर पाकिस्ताननं देखील भारतावर प्रतिहल्ला केला होता. मात्र, पाकिस्तानचे सर्व हल्ले भारतानं उधळून लावले होते.भारताच्या ऑपरेश सिंदूरनंतर पाकिस्तान चांगलाच घाबरला आहे. भारतानं पाकिस्तानची एअरबेस देखील खाक केली होती. त्यानंतर पाकिस्तान भारताशी चर्चा करण्यासाठी तयार असल्याचं शाहबाज शरीफ यांनी म्हटलं आहे.

एकीकडे पाकिस्तान शांतता प्रस्थापित करण्यासाठी भारतासोबत चर्चा करणार असल्याचं सांगत आहे. मात्र, दुसरीकडे त्यांच्या कुरघोड्या या सुरूच आहेत. बीएसएफनं ७० पेक्षा जास्त पाकिस्तानी



चौक्या उद्धवस्त केल्या आहेत. लूनीमधील लष्कर-ए-तोयबाच्या लॉन्चपॅडवरही हल्ला बीएसएफनं हल्ला केला. सांबामध्ये शहीद जवानांच्या नावे चौक्या असणार आहेत. पाकिस्तान हा दहशतवाद्यांचा पाठिराखा असल्याचं जगाला माहिती आहे. तसंच पाकिस्तान हा भारताविरोधात कुरघोड्या करणं थांबवणार नाही.

हे भारतासह अख्ख्या जागाला माहिती.. त्यामुळे पंतप्रधान नरेंद्र मोदींनी पाकिस्तानला सुधरण्याचं आव्हान करत इशारा देखील दिला आहे.

## परतुर शहरात महिलांकरीता शौचायालय नाही

**आत्ताच एक्सप्रेस**

**परतुर/ प्रतिनिधी/** ग्रामीण भागातील महिलाना मोंढा भागात शौचालय नसल्याने अनेक अडचणीना सामोरे जावे लागत आसताना नगर परिषद असुरी आनंद अजुण किती दिवस घेणार उर्कीडे साहेब परतुर शहरातील मोंढा भागात मोठी बाजार पेठ असुण जुन्या पोलीस चौकी पाठीमागे असणारी मुतारी केवळ पुरुषा करिता असल्याने ग्रामीण भागातून येणाऱ्या महिला साठी शौचालय नसल्याने त्यांना अनेक अडचणी ना समोरो जावे लागत असल्याचे अनेक व्यापारी बोलुन दाखवत आहे.

### राजकिय पुढाऱ्यांची उदासीनता ?

तसेच नवीन पोलीस चौकीच्या उदघाटन प्रसंगी सर्व राजकीय पक्षाचे नेते मंडळी एक सुरात जुण्या पोलीस चौकीच्या जागेवर नागरिका करिता शौचालय उभारण्याचे आपल्या भाषणात म्हणाले परंतु कालानंतरा नी त्यांना याचा विसर पडलेला दिसत असुण परतुर शहरातील विविध भागात आणि मोंढा बाजारपेठ भागात महिला साठी शौचालयाची गरज आहे.परतुर च्या राजकिय नेत्याना या प्रश्नाची गरज वाटत नाही का असा प्रश्नन शहरासह ग्रामीण भागातील सर्व सामान्य नागरिक उपस्तीत करत आहे.

ग्रामीण भागातुन मोठ्या प्रमाणात खरेदी करिता येणाऱ्या माता भगिणीला मोंढा भागात शौचालय नसल्याने वाहनाचा किंवा कुठ तरी अडोसा शोधावा लागत असुन ही आपल्या शहरा करिता दुर्देवी बाब आहे.नगरपरिषदेती सत्ताधारी याना मात्र या गंभिर प्रश्नावर काम करणयाची गरज वाटत नाही का? अनेक वर्षीपासुन सत्ताकुणाची असी चर्चा रंगुलागली आहे.

या प्रकरणी पाणीपुरवठा विद्यामान आमदार बबनराव लोणीकर यांणी लक्ष देण्याची गरज आहे लोणीकर यांनी लक्ष दिल्यास महीलाची शौचालय प्रति होणारी अडचण दुर होईल असे मत शहरासह ग्रमीण भागातील नागरिक व्यक्त करत आहे.

## फुलंब्री तालुक्यातील राहिलेले वैयक्तिक रोजगार हमी योजनेचे कामे सुरु करण्यास परवानगी द्यावे



**आत्ताच एक्सप्रेस**

**फुलंब्री/ प्रतिनिधी/** फुलंब्री तालुक्यातील २०२४-२५ वर्षातील वैयक्तिक कामे गाय गोठा,विहीर,फळबाग शेततळे यांना तात्काळ चालू करण्यासाठी आपल्या स्तरावर परवानगी मिळवुन देण्यासाठी काल दिनांक २६ मे सोमवार रोजी प्रहार जन शक्ति पक्षातर्फे पंचायत समिती समोर वोले स्टाईलने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाने पंचायत समिती कार्यालयात खलबल उडाली.

२०२४-२५ वर्षातील वैयक्तिक कामे गाय गोठा,विहीर,फळबाग शेततळे यांना तात्काळ लागु करावे.शेतकऱ्यांची होत असलेली शासनाकडून फसवणूक तात्काळ रोखण्यासाठी आपण जे काम मंजूर झालेले असतील त्यांना कामे करण्यासाठी परवानगी द्यावी. अशी मागणी करिता पंचायत समिती समोर शोले स्टाईलने आंदोलन करण्यात आले या प्रसंगी कृष्णा गाडेकर प्रहार युवा जिल्हाध्यक्ष सुदाम गायकवाड उपजिल्हाध्यक्ष मच्छिंद्र जंजाळ तालुका अध्यक्ष रामू खाकरे तालुका अध्यक्ष रावसाहेब खिल्लारे कार्याध्यक्ष दिलीप शिंदे तालुका उपाध्यक्ष बापूसाहेब जंगले ,प्रभाकर आढाव ,अमोल कोलते ,गणेश सूरभय्ये विठ्ठल ब्राह्मणे यांच्या सह आदींची उपस्थिती होती.

## श्री लक्ष्मीनारायण मंदिर शिक्षण, समाजसेवा, संस्कार, सांस्कृतिक उन्नतीचे केंद्र - केंद्रीय गृहमंत्री अमित शाह

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई /प्रतिनिधी/** श्री लक्ष्मीनारायण मंदिर हे केवळ धार्मिक स्थळ नसून, शिक्षण,समाजसेवा, संस्कार आणि सांस्कृतिक उन्नतीचे केंद्र आहे. हे ठिकाण भविष्यात मध्यमवर्गीयांसाठी आरोग्यसेवा, सांस्कृतिक शिक्षण, मातृभाषा संवर्धन यासाठी एक समर्पित केंद्र बनू शकते, असे प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केले. लक्ष्मीनारायण मंदिर हे गेल्या दीडशे वर्षांपासून समाजसेवेचा अखंड दीप प्रज्वलित करत आलेले श्रद्धास्थान असल्याचे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केले.

श्री लक्ष्मी नारायण मंदिराचा १५० वा वर्धापन दिन सोहळा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि मान्यवरांच्या प्रमुख उपस्थितीत झाला. कार्यक्रमास उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, विधानसभेचे अध्यक्ष ड.राहुल नार्वेकर, कौशल्य विकास रोजगार उद्योजकता आणि नाविन्यता मंत्री मंगल प्रभात लोढा, यांच्यासह विश्वस्त मंडळाचे सदस्य आणि भाविक उपस्थित होते. केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह म्हणाले, सन १८७५ मध्ये विदेशी सत्तेच्या काळात मंदिराच्या माध्यमातून सामाजिक चेतना निर्माण करणारे कार्य महान विभूतींनी केले. या मंदिराचे आणि माधवबाग ट्रस्टचे समाजासाठीचे योगदान कौतुकास्पद आहे. लक्ष्मीनारायण मंदिरचे ट्रस्टच्या 'शुचिता, संतुलन आणि सत्कर्म' या मूल्याधिष्ठित कार्यपद्धतीचे विशेष कौतुक केंद्रीय गृहमंत्री श्री. शाह यांनी केले. २०० व्या वर्षपूर्तीच्या दिशेने वाटचाल करताना हे केंद्र केवळ धार्मिक नव्हे, तर सामाजिक आणि शैक्षणिक दृष्टिकोनानेही समृद्ध व्हावे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ११ वर्षांच्या कार्यकाळाचा गौरव करत केंद्रीय गृहमंत्री श्री. शहा म्हणाले, या काळात भारताने ऐतिहासिक प्रगती केली आहे. राम मंदिर उभारणी, काशी विश्वनाथ कॉरिडॉर, योगाचा जागतिक प्रचार, ऑपरेशन सिंदूर या सारख्या कृतींमुळे भारताचा आत्मविश्वास वाढवण्याचे कार्य झाले असल्याचे श्री. शाह यांनी सांगितले.

सांस्कृतिक, धार्मिक कार्यक्रमातून समाजाला दिशा - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस म्हणाले, लक्ष्मीनारायण मंदिराने गेल्या दीडशे वर्षांत समाजोपयोगी, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांच्या माध्यमातून समाजाला दिशा दिली आहे. या मंदिराच्या विश्वस्त मंडळाचे कार्य फक्त मंदिरापुरते मर्यादित नाही, तर समाजसेवा, मदतीचे कार्य, सांस्कृतिक मूल्ये आणि धर्माच पालन या सर्व क्षेत्रांमध्ये मोठे आहे. भविष्यात या मंदिर व विश्वस्त मंडळास आवश्यक ती मदत केली जाईल.




मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, यापूर्वीही आपण या मंदिरात दर्शन घेतले असून आताही दर्शन घेण्याचा योग आला याचा आपणास आनंद आहे. लक्ष्मी नारायण मंदिर श्रद्धेचे प्रतीक आहे. येथे प्रत्यक्ष भगवान वास करत असल्याची भावना गेली १५० वर्षे भक्तांच्या मनात असून येथील सेवा कार्य हे अखंड चालू असल्याबद्दल मुख्यमंत्री फडणवीस यांनी गौरवोद्गार काढले. तत्पूर्वी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासह मान्यवरांनी लक्ष्मी नारायण मंदिरात दर्शन घेतले.

## ५ लाख रुपयांची लाच घेताना उपजिल्हाधिकारी विनोद खिरोळकरला अटक

**आत्ताच एक्सप्रेस**

**छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी/** महाराष्ट्रात गेल्या काही महिन्यात सरकारी अधिकाऱ्यांकडून लाच घेण्याचं प्रमाण वाढल्याचं दिसून येत आहे. कारण, एसीबीच्या धाडीत ग्रामसेवकापासून ते तहसीलदारांपर्यंत कारवाई केल्याची अनेक प्रकरणे उघडकीस आली आहेत. विशेष म्हणजे परभणी जिल्ह्यात महिला क्रीडा अधिकाऱ्यासही लाच घेताना रंगेहात अटक करण्यात आली होती. या घटनेनं जिल्ह्यात खळबळ उडाली होती, आता छत्रपती संभाजीनगरमध्ये चक्क निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांस अटक करण्यात आली आहे.तब्बल ५ लाख रुपयांची लाच घेताना एसीबीने आरडीसी महोदयांना रंगेहात अटक केली आहे.विशेष म्हणजे या प्रकरणात तक्रारदाराकडे तब्बल ४१ लाख रुपयांच्या लाचेची मागणी करण्यात आली होती.

जिल्हाधिकारी कार्यालयातील आरडीसी म्हणजेच निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांना ५ लाख रुपयांची लाच घेताना लाचलुचपत प्रतिबंधक विभागाच्या अधिकाऱ्यांकडून अटक करण्यात आली आहे. अव्वल कारकुनामार्फत ही लाच घेण्यात येत असताना अटक करण्यात आली असून विनोद खिरोळकर असं आरडीसींचं नाव आहे. वर्ग २ ची जमीन वर्ग १ करण्यासाठीपूर्वी





या निवासी उपजिल्हाधिकाऱ्यांनी तब्बल ४१ लाख रुपयांच्या लाचेची मागणी केली होती. त्यानुसार, संबधित तक्रारदाराकडून २३ लाख रुपये घेतले होते. मात्र, तरीही १८ लाख पुन्हा मागण्यात आले होते. त्यातील ५ लाख रुपयांची लाच घेताना आरोपीला अटक करण्यात आली आहे. अव्वल कारकून त्रिभुवन यांच्यामार्फत ही लाच घेतली जात होती. या घटनेनं जिल्ह्याच्या प्रशासकीय वर्तुळात खळबळ उडाली आहे.

#### पोलिसांना झाडाझडतीत काय मिळालं?

विनोद गोंडुराव खिरोळकर, पद निवासी उप जिल्हाधिकारी तथा अपर जिल्हा दंडाधिकारी छत्रपती संभाजी नगर, याची घरझडती घेतली असता खालील प्रमाणे मौल्यवान मालमत्ता मिळून आली आहे.

१) रोख रक्कम-१३,०६,३८०/-

२) सोन्याचे दागिने - ५८९ ग्रॅम किंमत अंदाजे, ५०,९९,५८३/-

३) चांदीचे दागिने- ३ किलो ५५३ ग्रॅम किंमत ३,३९,३४५/-

मौल्यवान वस्तू आणि रोख रक्कम अशी एकूण किंमत- ६७,४५,३०८/- रुपये मिळून आले आहेत.

दिलासा देणारे महसूल विभागाचे निर्णय, पण भ्रष्टाचार बोकाळला

दरम्यान, एसीबीच्या या कारवाईमुळे पुन्हा एकदा महसूल आणि जिल्हा प्रशासनातील भ्रष्टाचाराचं पितळ उघडं पडलं असून शासकीय फाईलवर वजन ठेवल्याशिवाय सर्वसामान्य नागरिकांची कामे होत नाहीत. विशेष म्हणजे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्यामार्फत सर्वसामान्य व शेतकरी वर्गाला दिसाला देण्यासाठी चांगले निर्णय घेतले जात आहेत. त्यामध्ये, वर्ग २ ची जमीन वर्ग १ करण्यासंदर्भातही महत्त्वाचा निर्णय काही दिवसांपूर्वीच घेण्यात आला आहे. तर, आज आता फक्त ५०० रुपयांमध्ये भाऊबंदकीची वाटणी करण्याचा निर्णय मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला आहे. महसूल खात्यामध्ये एक मोठा निर्णय घेण्यात आला आहे. शेतकऱ्यांना त्यांच्या शेतीची आपसामध्ये वाटणी करायची असेल तर एकूण रेडीरेकनरच्या एक टक्के किंमत मोजावी लागायची. आता त्यामध्ये बदल करण्यात आला आहे. या निर्णयामुळे शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे. मात्र, ग्रामसेवक, तलाठी ते उपजिल्हाधिकाऱ्यांपर्यंतच्या भ्रष्टाचाराल कधी ब्रेक लागणार हा प्रश्न कायम आहे.

## शेतकऱ्यांच्या हक्काचं ८० कोटी अनुदान सरकारी बाबुंनीच लाटलं!

**आत्ताच एक्सप्रेस**

**जालना/प्रतिनिधी/** जालन्यात अतिवृष्टी अनुदान घोटाळ्याच्या चौकशीतून अनेक धक्कादायक माहिती समोर येतीये. शेतकऱ्यांसाठी शासनानं मंजुर केलेलं अनुदान सरकारी बाबूंनीच लाटलंय.आता घोटाळ्याच्या चौकशीतून अनुदानाची ८० कोटींची रक्कम तलाठ्यांनी ३० हजार बोगस खात्यात वळवल्याचं समोर आलंय.

सरकारी खात्यात भ्रष्टाचार किती फोफावलाय? याबद्दल सविस्तर जाणून घेऊया. 'कुंपणानेच शेत खाल्लं...' ही म्हण आपल्या सगळ्यांना माहिति आहे.

याच म्हणीप्रमाणे जालन्यात सरकारी अधिकारी, कर्मचायांनीच शासकीय अनुदानावर डल्ला मारलाय.जालना जिल्ह्यात सध्या अतिवृष्टी आणि गारपीट अनुदानात झालेल्या घोटाळ्याची चौकशी सुरू आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी नेमलेल्या त्रिस्तरीय समितीकडून ही चौकशी केली जातीये. या समितीच्या तपासणीत धक्कादायक माहिती समोर आलीये. आतापर्यंत अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील ३० हजार बोगस शेतकरी दाखवून त्यांच्या बँक खात्यात ८० कोटी रुपये वळते केल्याची माहिती समोर आलीये. त्यामुळे जिलह्यात एकच खळबळ उडालीय. तर अनुदानाच्या काही याद्यांमध्ये शेतकऱ्यांची दुबार नावं देखील आढळलीयेत

नेमका घोटाळा काय?

जालना जिल्ह्यात २०२४ च्या सप्टेंबर महिन्यात अतिवृष्टी झाली. नुकसान भरपाईपोटी जिल्ह्यातील साडेतेरा लाख लाभार्थी शेतक-यांसाठी १ हजार ५५० कोटी रुपयांचा निधी मिळाला. एकूण ८ जीआर निश्चित करून १ हजार १५० कोटी रुपयांचं अनुदान वाटप करण्यात आलं मात्र अनुदान वाटप करताना तलाठी, मंडळाधिकारी,यांनी घोटाळा केला. अंबड आणि घनसावंगी तालुक्यातील ३० हजार बोगस खात्यात ८० कोटी रुपये वळते केले. घोटाळा झाल्याचं





समजताच चौकशी समिती नेमून चौकशी करण्यात आली.

या तपासातून अनके धक्कादायक माहिती समोर येतीये अंबड आणि घनसावंगी या दोन तालुक्यातच तलाठ्यांनी केलेले कारनामे कोट्यावधी रुपयांच्या घरात गेल्यानं जिल्हाधिकाऱ्यांनी संपूर्ण जिल्ह्यातील अनुदान वाटपाच्या चौकशीचे आदेश दिलेत.

अतिवृष्टी अनुदान घोटाळा थोडा थोडका नसून हा घोटाळा १०० कोटी रुपयांचा असल्याचा आरोप स्वाभिमानी शेतकरी संघटनेनं केलाय.या घोटाळ्यातील सर्व अधिका-यांवर कारवाई करा अन्यथा तीव्र आंदोलनाचा ईशारा देण्यात आलाय. सध्या चौकशी समितीकडून ६१ जणांचं पथक सातबारा आणि नमुना नंबर ८ च्या आधारे या बोगस अनुदानाची पडताळणी सुरुय. गावनिहाय ही चौकशी सुरू आहे.

त्यामुळे १ जूनपर्यंत समितीचा अहवाल आल्यानंतर दोषी असणाऱ्या अधिकारी, कर्मचाऱ्यांवर कारवाईचा बडगा उगारला जाण्याची शक्यता आहे. मात्र शेतकऱ्यांच्या हक्काच्या अनुदानावर डल्ला मारणाऱ्या या अधिकारी,कर्मचाऱ्यांवर कठोर कारवाईची मागणी आता केली जातीये.

# शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार व्हावा!

मुंबईत मान्सूनने जोरदार सलामी दिली आहे. मागील दोन तीन दिवसांपासून मुंबईत चालू असलेल्या पावसाने मुंबईकरांची त्रेधातिरपीट उडवली. रविवारी तर मुंबईत २९४ मिली पाऊस झाला. तब्बल १०७ वर्षांनंतर मुंबईत मे महिन्यात विक्रमी पाऊस झाला. मुंबईत पावसाने जोरदार हजेरी लावल्याने मुंबई पुन्हा एकदा तुंबली. पाणी तुंबल्यामुळे मुंबईकरांचे अतोनात हाल झाले. जागोजागी गुडघाभर पाणी साचले. रस्त्यांवर देखील पाणी साचले. रस्त्यांवर पाणी आल्याने रस्ते वाहतूक खोळंबली. महामार्गावर पाणी आल्याने शेकडो गाड्या जागेवरच थांबल्या त्यामुळे वाहतूक कोंडी झाली. रिक्षा, टॅक्सी यांनी जणू अघोषित संप पुकारला. रेल्वे मार्गावर पाणी साचून रूळ पाण्याखाली रेल्वेचे वेळापत्रक कोलमडले. पावसामुळे काही लांब पल्ल्याच्या गाड्या उशिराने धावू लागल्या.

लोकलही धीम्या गतीने सोडाव्या लागल्या. लोकांच्या घरात पाणी साचल्याने लोकांचा संसार पाण्याखाली गेला. एकूणच पावसाने मुंबईची चांगलीच दैना उडवली. या पावसाने २६ जुलै २००५ रोजी झालेल्या प्रलयकारी पावसाची आठवण झाली. पावसामुळे मुंबईची दैना झाल्यावर नेहमीप्रमाणे दोषारोपांची मालिका सुरू झाली.

सत्ताधारी व विरोधक एकमेकांवर आरोपांच्या फैऱ्या झाडू लागले. मोठ्या पावसाने मुंबईची दैना का झाली याला जबाबदार कोण ? यावर राजकारण सुरू झाले ; पण मोठ्या पावसानंतर मुंबईची दैना का होते ? पाऊस वाढला की मुंबईची तुंबई का होते ? या प्रश्नाकडे मात्र सर्वच पक्ष सोईस्कर डोळेझाक करीत आहेत. २६ जुलैच्या पावसानंतर शासन, प्रशासन आणि नागरिकांनीही कोणताच धडा घेतला नाही म्हणूनच ही वेळ पुन्हा आली. पूर्वी मुंबईत मोकळ्या जागा असायच्या त्यामुळे तिथे पाण्याचा निचरा व्हायचा. पण आता मुंबईत मोकळ्या जागाच राहिल्या नाहीत. विकासाच्या नावाखाली मुंबई सिमेंटचे जंगल बनले आहे. मुंबईतील रस्तेही सिमेंटचे आणि पेव्हर ब्लॉकचे बनले आहे त्यामुळे पाणी मुरायला मुंबईत जागाच नसते. त्यात मोठा पाऊस आणि भरती एकाच वेळी आली तर ते सर्व पाणी नागरी वस्तीतच शिरते. मुंबई तुंबण्याचे आणखी एक कारण म्हणजे प्लास्टिक ! राज्य सरकारने प्लास्टिकवर बंदी घातली असली तरी मुंबईत दररोज हजारो टण प्लास्टिक कचरा जमा होतो. या प्लास्टिक कचऱ्याचे व्यवस्थापन करण्यात प्रशासन अपयशी ठरत आहे. हे प्लास्टिक नदी, नाल्यामध्ये अडकल्याने तेथून पावसाचे पाणी वाहत जाण्यास अडचण निर्माण होते. राज्य सरकारने प्लास्टिकवर घातलेली बंदी किती योग्य आहे हे या पावसामुळे तरी नागरिकांना समजेल.

नागरिकांनीही प्लास्टिकचा वापर टाळायला हवा. यासोबतच नागरिकांनी वाटेल तिथे कचरा टाकायची सवयही मोडायला हवी. ग्लोबल वॉर्मिंगमुळे दरवर्षी मुंबईच्या समुद्र पातळीत वाढ होतेय. मुंबई तुंबण्याचे हे ही एक कारण आहे. पावसामुळे केवळ मुंबईचीच नाही तर सर्वच मोठ्या शहरांची अशीच अवस्था होते. मागील वर्षी दिल्लीत झालेल्या मुसळधार पावसामुळे दिल्ली जलमय झाल्याचे आपण पाहिलेच आहे. पाच वर्षापुर्वी राज्याची उपराजधानी असलेल्या नागपूर शहराचीही पावसामुळे दैना झाली होती. मुसळधार पावसामुळे नागपूर शहर पाण्याखाली गेले होते. त्यावेळी विधिमंडळाचे अधिवेशन नागपुरात सुरू होते. इतका पाऊस झाला की पावसाचे पाणी थेट विधान भवनात शिरले होते. त्यामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करावे लागले.

पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची नामुष्की सरकारवर आली होती. पावसामुळे विधिमंडळाचे अधिवेशन तहकूब करण्याची इतिहासातील ती पहिलीच वेळ होती. मागील काही वर्षात पावसामुळे पुणे, मुंबई, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली ही शहरे जलमय झाल्याचे आपण पाहिले आहे. राज्यातील सर्वच शहरात कमी अधिक प्रमाणात हीच परिस्थिती आहे. पाऊसही बेभरवशाचा झाला आहे. पूर्वीसारखा पावसाचा देखील अंदाज येत नाही. दोन दोन महिने न येणारा पाऊस दोन तासात येऊन दोन महिन्यांची सरासरी गाठतो.

आता हेच पहा ना यावर्षी मे महिन्यातच पावसाने धुमाकूळ घातला आहे. मे महिन्यातील पावसाने आजवरचे सर्व रेकॉर्ड तोडून टाकले आहेत. मे महिन्यात असा इतका पाऊस यापूर्वी कधीही झाला नव्हता. या सर्व परिस्थितीचा विचार करता मुंबई, पुणे, नागपूर, नाशिक, औरंगाबाद, कोल्हापूर, सांगली यासारख्या मोठ्या शहरांच्या नियोजनाचा पुनर्विचार होणे गरजेचे आहे. जलव्यवस्थापनाची आजची पद्धत बदलून नवीन पद्धतीचा अवलंब करायला हवा. त्यासाठी उच्च तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. त्यासाठी परदेशातील तज्ज्ञांची मदत घ्यायला हवी. परदेशातील जलव्यवस्थापनाचा अभ्यास करण्यासाठी तज्ज्ञांना परदेशात पाठवायला हवे. परदेशातील अधिकाऱ्यांची त्यासाठी मदत घ्यायला हवी.




### स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अभ्यास व संशोधन केंद्राचे उद्घाटन

# स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याशी संबंधित ठिकाणांना जोडणारे अखिल भारतीय सावरकर सर्किट तयार करावे - राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई प्रतिनिधी**/ मुंबई विद्यापीठ हे स्वातंत्र्यवीर सावरकर यांचे शिक्षणाचे स्थळ असून त्यांच्या जीवन आणि कार्याला समर्पित अभ्यास आणि संशोधन केंद्र दिशादर्शक आणि प्रेरणादायी ठरेल. स्वातंत्र्यवीर सावरकर यांच्याशी संबंधित ठिकाणांना जोडणारे अखिल भारतीय सावरकर सर्किट तयार करण्याचे प्रयत्न व्हावे,असे राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन यांनी सांगितले.

मुंबई विद्यापीठ येथील सर कावसजी जहाँगीर दीक्षांत सभागृह येथे आयोजित कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उच्च व तंत्र शिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील, सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार, यांच्या प्रमुख उपस्थिती स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अभ्यास व संशोधन केंद्राचे (ऑनलाइन) उद्घाटन आणि स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या १४२व्या जयंतीच्या पूर्वसंध्येनिमित्त विशेष व्याख्यान आयोजित करण्यात आले. यावेळी आमदार अतुल भातखळकर, पराग अळवणी, मुंबई विद्यापीठाचे कुलगुरु प्रा. रविंद्र कुलकर्णी, प्र-कुलगुरु अजय भामरे, कुलसचिव डॉ. प्रसाद कारंडे यांच्यासह प्राध्यापक,विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

राज्यपाल सी. पी. राधाकृष्णन म्हणाले की, स्वातंत्र्यवीर सावरकर हे थोर विद्वान, कवी, इतिहासकार, पुरोगामी विचारवंत आणि अग्रणी समाजसुधारक होते. ते अस्पृश्यतेच्या सामाजिक दुष्कृत्याच्या विरोधात होते. त्यांनी अस्पृश्यतेच्या प्रथेला पाप आणि माणुसकीवरील कलंक मानले. ते रूढीवादाच्या विरोधात उभे राहिले. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनीही जातीभेद निर्मूलनासाठी सावरकरांच्या कार्याचे आणि वचनबद्धतेचे कौतुक केले होते.

मुंबई विद्यापीठात स्थापन होत असलेले हे अभ्यास आणि संशोधन केंद्र सावरकरांचे साहित्य, विचार आणि तत्त्वज्ञान यांना प्रोत्साहन देईल तसेच त्यांचा प्रसार करेल असे राज्यपाल राधाकृष्णन यांनी सांगितले.

**स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अभ्यास व संशोधन केंद्रासाठी आवश्यक निधी देणार - मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अभ्यास आणि संशोधन केंद्राच्या माध्यमातून सावरकरांचा जीवनप्रवास उलगडेल. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या जीवनातील विविध पैलूंमध्ये इतकी ताकद होती की, त्यांतील एक-एक पैलूंवर समग्र संशोधन करता येईल. त्यांच्या नावाने मुंबई विद्यापीठात स्थापन संशोधन केंद्रास आवश्यक निधी दिला जाईल.

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांच्या क्रांतिकारी कार्यामुळे आणि ब्रिटिश सरकारविरुद्धच्या कृतीमुळे ब्रिटिशांनी त्यांची बॅरिस्टर पदवी काढून घेतली. ही पदवी परत मिळवण्यासाठी विद्यापीठाने सविस्तर प्रस्ताव तयार करावा. राज्यशासन यासंदर्भात इंग्लंडमधील संबंधित संस्थांशी पत्रव्यवहार करेल आणि त्यांना मरणोत्तर बॅरिस्टर पदवी देण्यासाठी प्रयत्नशील राहील, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

स्वातंत्र्यवीर सावरकरांचा जीवनप्रवास प्रेरणादायी असून, लहानपणीच स्वातंत्र्यालढ्यात सहभागी होऊन त्यांनी 'अभिनव भारत' सारखी संस्था स्थापन केली. इंग्रज ज्याला 'सिक्रेट सोसायटी' म्हणत. या संस्थेच्या माध्यमातून भारतीयत्व आणि भारतीय स्वातंत्र्याबाबत जनजागृती, संघटन करून त्यांनी क्रांतीला चालना दिली. विशेषतः जोसेफ मॅझिनीच्या आत्मचरित्राचे त्यांनी भाषांतर केले आणि क्रांतीसंदर्भातील धडे देण्याचे काम केले.

सन १८५७ च्या युद्धाला सुरुवातीला 'शिपाई बंड' असे संबोधले गेले. स्वातंत्र्यवीर सावरकर हे पहिले व्यक्ती होते, ज्यांनी या संघर्षाला केवळ शिपायांचं बंड न मानता, तो एक स्वातंत्र्यलढा होता, असे ठामपणे सांगितले.

'भारतीय इतिहासातील सहा सुवर्णपाने' या त्यांच्या पुस्तकातून इंग्रजांच्या दडपशाहीखाली दडपलेला इतिहास त्यांनी समाजासमोर आणला. त्यांचा आत्मविश्वास, धाडस आणि निर्णायक कृती आजही प्रेरणादायी ठरते. देशासाठी झगडताना त्यांनी कधीही हार मानली नाही. बौद्धिक, सामाजिक आणि क्रांतिकारी योगदान दिले. आजच्या पिढीसाठी त्यांचे योगदान अत्यंत प्रेरणादायी आहे, असेही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी यावेळी सांगितले.

**कलिना कॅम्पसमध्ये स्वातंत्र्यवीर सावरकर यांचा पुतळा उभारणार - उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील**

स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर यांनी पारतंत्र्याविरुद्ध दिलेली झुंज, त्यांचे विचार आणि साहित्य यांचा अभ्यास करण्यासाठी मुंबई विद्यापीठात अभ्यास व संशोधन केंद्र सुरू करण्यात येत आहे. याच परिसरात त्यांचा पुतळा सुद्धा उभारण्यात येणार आहे. यासाठी जागा उपलब्ध झाली आहे अशी घोषणा उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांनी केली.

सावरकरांचे क्रांतिकारक रूप सर्वांनाच ज्ञात आहे. मात्र, जेव्हा त्यांना रत्नागिरी जिल्ह्यात दोन वर्षांसाठी नजरकैदेत ठेवण्यात आले, तेव्हा त्यांच्यावर प्रक्षोभक भाषणे आणि लिखाण करण्यास बंदी घालण्यात आली होती.

त्या काळात त्यांनी सामाजिक समतेसाठी केलेले कार्य फारसे समोर आले नाही. रत्नागिरीतील पतितपावन मंदिराच्या उभारणीत त्यांनी सर्व जातींसाठी मंदिर खुले केले. त्यांनी सामूहिक भोजन आणि आंतरजातीय विवाहाचे आयोजनही केले. सावरकरांचे हे सामाजिक योगदान आणि विचार लोकांपुढे यावेत, यासाठी प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या मार्गदर्शनानुसार हे अध्यासन केंद्र उभारण्यात येत आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांचा सामाजिक विचार व्यापक होता. त्यांच्या विचारांना उजाळा देण्यासाठी 'पतितपावन मंदिर ते चैत्यभूमी' अशी यात्रा काढण्यात आली होती. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी २०२० मध्ये नवीन शैक्षणिक धोरण जाहीर करताना म्हटले होते की, देशाला २०४७ पर्यंत जगात पहिल्या क्रमांकावर घेऊन जायचे असेल आणि प्राचीन वैभव पुन्हा मिळवायचे असेल तर गुलामगिरीच्या मानसिकतेतून बाहेर पडले पाहिजे. त्यासाठी भारतीय ज्ञानपरंपरा आणि इतिहास नीट शिकवावा लागेल. या पार्श्वभूमीवर स्वातंत्र्यवीर सावरकर अभ्यास व संशोधन केंद्र नक्कीच प्रेरणादायी ठरेल, असेही श्री. पाटील यांनी सांगितले.




**छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्यातून जगण्याची प्रेरणा मिळते - सांस्कृतिक कार्य मंत्री ड.आशिष शेलार**

छत्रपती संभाजी महाराज हे प्रेरणा असल्याने 'राज्य प्रेरणागीत पुरस्कार' जाहीर करण्यात आला. छत्रपती संभाजी महाराज हे केवळ पराक्रमी योद्धे नव्हते, तर अत्यंत बुद्धिमान आणि बहुभाषिक व्यक्तिमत्त्व होते. मराठीसोबत संस्कृत, हिंदी, इंग्रजी व अन्य भाषांवर त्यांचे प्रभुत्व होते. त्यांनी साहित्यनिर्मिती, ग्रंथलेखन, कविता आणि विविध प्रकारच्या लिखाणातून अनमोल कार्य केले. त्यामुळे राज्याच्या प्रेरणागीत पुरस्कारासाठी छत्रपती संभाजी महाराज यांच्यापेक्षा दुसरे नाव विचारात येणे शक्य नव्हते, छत्रपती संभाजी महाराजांच्या कार्यातून आपल्याला जगण्याची प्रेरणा मिळते. स्वातंत्र्यवीर सावरकर लिखित मराठी प्रेरणागीत 'अनादि मी, अनंत मी..' हे प्रचंड आत्मबळ असलेले गीत. त्यामुळेच राज्य शासनाने हा पुरस्कार दिला असल्याचे मंत्री ड.शेलार यांनी यावेळी सांगितले.

प्रास्ताविकात मुंबई विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. रवींद्र कुलकर्णी म्हणाले, स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अभ्यास व संशोधन केंद्र, स्वातंत्र्यवीरांच्या लेखनाचा, त्यांच्या उपलब्ध भाषणांचा व त्यांच्या राष्ट्रकार्याचा अकादमिक स्तरावर अभ्यास करेल तसेच त्यावर विद्वत्तापूर्ण चर्चा घडवेल आणि सावरकरांना समर्पित असलेले केंद्र सामाजिक सुधारणा, स्वातंत्र्य आदी विचारांचा विद्यार्थी, शिक्षणतज्ज्ञ आणि संशोधकांच्याद्वारे अभ्यास करेल व त्याद्वारे एक जागतिक विचारमंच प्रस्थापित करण्याचा प्रयत्न करेल. या केंद्राच्या वतीने प्रमाणपत्र, पदविका, पदवी, पदव्युत्तर पदवी आणि विद्यावाचस्पती अशा विविध अभ्यासक्रमांचे आयोजन केले जाणार आहे. स्वातंत्र्यवीर सावरकरांच्या भाषाशुद्धीचा विचार, प्रेम आणि आग्रह लक्षात घेऊन पुढील दोन वर्षात विज्ञान व तंत्रज्ञानातील सर्व अभ्यासक्रमातील विविध अभ्यासक्रमातील आशय हे मराठी भाषेत आणले जाईल. स्वातंत्र्यवीर सावरकर विचारांचा अभ्यास करणारे भारतातले पहिलेवहिले स्वातंत्र्यवीर विनायक दामोदर सावरकर अभ्यास व संशोधन केंद्र हे प्रबळ असावे, सक्षम असावे,

संशोधकांना योग्य असं साहाय्य मिळावे या दृष्टीने मुंबई विद्यापीठाने महाराष्ट्र शासनाकडे शंभर कोटी रुपयांच्या अनुदानाचा प्रस्ताव सादर केला असल्याचेही त्यांनी सांगितले.

# संक्षिप्त

## गणेश बेटूदे यांची प्रशिक्षक म्हणून निवड



**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/भारतीय सोफ्टबॉल असो.व चंदीगड सॉफ्टबॉल असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने दि.२९ मे ते २ जून २०२५ दरम्यान पंजाब युनिव्हर्सिटी, चंदिगड येथे आयोजित ४३ व्या ज्युनिअर राष्ट्रीय सॉफ्टबॉल स्पर्धेसाठी ज्यांच्या मार्गदर्शनाखली महाराष्ट्र ज्युनिअर संघास पदक प्राप्त झालेले आहे, असे राष्ट्रीय प्रशिक्षक प्रा.गणेश बेटूदे यांची महाराष्ट्र राज्य मुलांच्या संघ प्रशिक्षक पदी निवड करण्यात आली आहे. या निवडीबद्दल छ.संभाजीनगरचे जिल्हा क्रीडा अधिकारी बाजीराव देसाई, भारतीय सॉफ्टबॉल संघटनेचे उपाध्यक्ष तथा राज्य सॉफ्टबॉल संघटनेचे सचिव डॉ.प्रदीप तळवेलकर,राज्य संघटना सहसचिव गोकुळ तांदळे,जिल्हा संघटनेचे अध्यक्ष डॉ.दत्ताभाऊ पाथ्रीकर,उपाध्यक्ष डॉ.फुलचंद सलामपुरे,डॉ.उदय डोंगरे,डॉ,डॉ संदीप जगताप,दीपक रुईकर, राकेश खैरनार,क्रीडा अधिकारी अक्षय बिरादार,संतोष आवचार, प्रवीण शिंदे,सचिन बोर्डे,भिमा मोरे, अजित झा,रफिक जमादार, स्वप्निल गुडेकर,आदींनी निवडीबद्दल अभिनंदन केले.

## ग्रामीण भागात ड्रोन उड्डाणास प्रतिबंध

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ जिल्ह्यातील ग्रामीण हद्दीत विनापरवाना ड्रोन, मानवरहित हवाई उपकरणे, पॅराशुट, पॅराग्लायडर सारख्या उपकरणांच्या उड्डाणास प्रतिबंध करण्यात आला आहे. जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी हे आदेश निर्गमित केले आहेत. भारतीय नागरिक सुरक्षा संहिता २०२३ चे कलम १६३ अन्वये जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी छत्रपती संभाजीनगर ग्रामिण जिल्हा हद्दीत ड्रोन उड्डाण क्रियांना दि.२० जून पर्यंत प्रतिबंध करण्यात येत आहे,असे आदेश निर्गमित केले आहे.

# शासनाच्या १०२७ सेवा १५ ऑगस्टपासून एकाच पोर्टलवरून- संजय काटकर



**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ राज्यशासनामार्फत दिल्या जाणाऱ्या १०२७ अधिसूचित सेवा ह्या ऑनलाईन दिल्या जातात. ह्या सर्व सेवा ह्या वेगवेगळ्या विभागांच्या व वेगवेगळ्या प्लॅटफॉर्मवरुन दिल्या जातात. ह्या सर्व सेवा ह्या १५ ऑगस्टपासून एकाच पोर्टलवरुन देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे,अशी माहिती महा आयटीचे व्यवस्थापकीय संचालक यांनी आज येथे दिली.

महा-आयटीमार्फत शासनाच्या सेवा नागरिकांना ऑनलाईन उपलब्धतेच्या अनुषंगाने स्थानिक आपले सेवा केंद्र चालकांच्या भेटी घेणे व स्थानिक प्रशासनाकडून माहिती घेणे यासाठी आज श्री. काटकर जिल्हाधिकारी कार्यालयात आले होते. जिल्ह्यातील आपले सेवा केंद्र चालकांची बैठक जिल्हा नियोजन सभागृहात घेऊन श्री. काटकर यांनी मार्गदर्शन केले. अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, प्रकल्प संचालक शरद दिवेकर हे ही यावेळी उपस्थित होते.

त्यांनी सांगितले की, सेवा अधिनियमाअंतर्गत शासनामार्फत दिल्या जाणाऱ्या ह्या सेवा एकाच प्लॅटफॉर्मवर आणण्याचे शासनाचे प्रयत्न सुरु असून त्यात १३८ सेवा ह्या ३१ मे पर्यंत एकत्रीत केल्या जाणार असून त्यापैकी ९२ सेवा एकत्रित केल्या आहेत. तर ३०६ सेवा ह्या ऑफलाईन दिल्या जातात त्याही ऑनलाईन करण्यासाठ प्रयत्न होत आहेत. अशा प्रकारे सर्व १०२७ सेवा १५ ऑगस्ट पर्यंत नागरिकांना देता येतील असे नियोजन आहे, असे त्यांनी सांगितले. या सेवा पुरवितांना सेवा केंद्र चालकांच्या अडचणी जाणून घेणे, येथे अधिक काम असते तेथे पाच लॉग ईन देणे, भूकेंद्रीत सेवा देणे, याबाबत माहिती घेण्यात येत आहे. जिल्ह्यात १०९४ सेवा केंद्र असून या सेवा केंद्रांवर सेवांचे दर प्रदर्शित करणे, क्यू आर कोड वर तक्रार दाखल करता येणे, भुस्थिर सेवा देणे इ. सुधारणा करण्यात येत असल्याचेही श्री.काटकर यांनी सांगितले.

या सेवांची माहिती लोकांना मिळावी म्हणून व्हॉटसअप वरुन चॅट्बोट सुविधा नजिकच्या काळात उपलब्ध करुन देण्यात येणार असल्याचेही त्यांनी सांगितले.

## माजी सैनिकांची महाडीबीटी पोर्टलवर नावनोंदणी;३१ मे पर्यंत मुदत

**आत्ताच एक्सप्रेस**
**छत्रपती संभाजीनगर प्रतिनिधी**/ सेवानिवृत्त माजी सैनिक/ विधवा/अनाथ पाल्य यांची शासनाच्या महाडीबीटी निःशुल्क नोंदणी करण्यात येत आहे. दि.३१ मे पर्यंत ही नोंदणी करण्यात येणार आहे. तालुकानिहाय नेमलेल्या सीएससी सेंटरशी संपर्क करुन ऑनलाईन पद्धतीने्.ारहरीरळपळ्ज्ञ.ारहरीरीहींीर.सींं.ळप या संकेतस्थळावर दिनांक ३१ मे पर्यंत नि:शुल्क नोंदणी करुन घ्यावी असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी यांनी केले आहे.

**आपले सेवा केंद्र अर्थात सीएससी सेंटर चेसंपर्क क्रमांक :-**

१. छत्रपती संभाजीनगर - ०९७६६०४१०२८, ०९२२६७६४१७२, ०९६३७११३२९२, ०९५९५९६२६००, ०८५५४०३११७६, ०९४२१४८९४३४.
२. सिल्लोड-०८६९८१२९५८४.
३. फुलंब्री-०९६६५२५७११३,०८२७५८१९४९५.
४. वैजापुर-०७३८७४३००१६.
५. गंगापुर-०९८९०७३९२७६, ०८३९०५१३९३९.
६. पैठण-०८६०५३३३५३२.
७. कन्नड-०९४२०३२८४०५.
८. सोयगांव-०७५०७२७६६३४.

**नावनोंदणीसाठी आवश्यक कागदपत्रे :-**

१. फोटो
२. आधार कार्ड
३. पॅन कार्ड
४. डिस्चार्ज पुस्तक सर्व पाने
५. पीपीओ
६. इसीएचएस कार्ड
७. पेंशन बँक पासबुक पहीले पान

नावनोंदणी करुन ऑनलाईन अर्ज व वरील सर्व कागदपत्रांची एक प्रत जिल्हा सैनिक कल्याण कार्यालय, नंदनवन कॉलनी, छत्रपती संभाजीनगर येथे जमा करावी. तरी सर्व माजी सैनिक/विधवा/ अनाथ पाल्य यांनी दि.३१ मे पर्यंत नावनोंदणी करावी, असे आवाहन जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी छत्रपती संभाजीनगर यांनी केले. अधिक माहीतीकरीता ०२४०-२३७०३१३/९७६३३२५४८७ या क्रमांकावर संपर्क करावा.

# पाचोडचे सार्वजनिक बांधकाम विभाग मराठवाड्यात प्रथम....





**प्रतिक्रिया**

महाराष्ट्र शासनाच्या शंभर दिवस कृती आराखडा उपक्रमांतर्गत पाचोड येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग या शासकीय कार्यालयात लोकांची कामे जलद गतीने व्हावीत. कार्यालयीन शिस्त लागावी, जनता आणि प्रशासन या मधली दरी दूर व्हावी, कार्यालयीन कामकाज पारदर्शीकपणे व्हावे तसेच नागरिकांच्या तक्रारींचा निपटारा जलदगतीने करण्यात आल्याने सदरील कार्यालय मराठवाडा विभागात तालुकास्तरीय मध्ये प्रथम आला आहे.यासाठी अधिकारी व कर्मचाऱ्यांनी मेहनत घेतली त्यामुळे सदरील कार्यालय मराठवाड्यात तालुकास्तरीय प्रथम आले आहे. - **(राजेंद्र बोरकर पाटीलः सहाय्यक अभियंता पाचोड)**

**आत्ताच एक्सप्रेस**
**पाचोड प्रतिनिधी**/ पाचोड (वा,)मुख्यमंत्री झाल्यानंतर देवेंद्र फडणवीस यांनी प्रशासन गतिमान होण्यासाठी राज्य शासनाच्या 'शंभर दिवस कृत्ती आराखडा कार्यालयीन सुधारणा' या उपक्रमात पाचोड ता.पैठण येथील सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्रमांक (३) कार्यालयाने मराठवाड्यात पहिले स्थान मिळले आहे, अशी माहिती उपविभागीय अभियंता राजेंद्र बोरकर यांनी दिली.

राज्यसरकार यांच्या संकल्पनेतून राज्यातील शासकीय कार्यालयांमध्ये 'शंभर दिवस कार्यालयीन सुधारणा' हा विशेष कार्यक्रम राबविण्यात आला. शासकीय कार्यालयात जनतेची कामे जलद गतीने व्हावीत, कार्यालयीन शिस्त लागावी, जनता आणि प्रशासन यामधली दरी दूर व्हावी, कार्यालयीन कामकाज पारदर्शी व्हावे, नागरिकांच्या तक्रारींचा जलदगतीने निपटारा करणे, आदी बाबींचा या उपक्रमात समावेश करण्यात आला होता. या उपक्रमात उत्कृष्ट कार्य करणाऱ्या शासकीय कार्यालयांना बक्षीस देण्यात येणार असल्याची घोषणा करण्यात आली होती. त्यानुसार या स्पर्धेचा नुकताच निकाल जाहीर करण्यात आला आहे. त्यात पाचोड येथील सार्वजनिक बांधकाम उपविभागाचे कार्यालय मराठवाड्यात पहिले आले आहे. हा उपक्रम राबविण्यासाठी उपविभागीय अभियंता राजेंद्र बोरकर, शाखा अभियंता प्रमोद मोरे, योगीराज चव्हाण, वरिष्ठ लिपिक बाळासाहेब केदार, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक गणेश यादव, गणेश म्हस्के आदींनी परिश्रम घेतले.या यशाद्दल सहाय्यक अभियंता राजेंद्र बोरकर यांचे राज्याचे माजी रोहयो फलोत्पादन मंत्री तथा छ.संभाजीनगर जिल्ह्याचे खासदार संदीपान पा.भुमरे, पैठणचे आमदार विलास पा.भुमरे,कृषि उत्पन्न बाजार समितीचे सभापत्ती राजुनाना भुमरे,सरपंच शिवराज भुमरे आदींनी अभिनंदन केले..

# अवकाळी पावसाने नाचनवेल पिशोर परिसरात शेतकऱ्यांचे हाल



**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड ग्रामीण प्रतिनिधी /सुनिल निकम** /कन्नड तालुक्यातील नाचनवेल पिशोर व नादरपुर परिसरात गेल्या आठवडाभरापासून वादळी वाऱ्यासह पडलेल्या अवकाळी पावसामुळे सतत मक्का उगत आहे सोगुन ठेवली बाजरी फुगून काळवंडली आहे. तसेच वादळवाऱ्याने आंब्याच्या झाडाखाली कैऱ्यांचा सडा पडला आहे.नाचनवेल टाकळी शाहु, आडगाव पि.मोहरा, डोंगरगाव, आमदाबाद, सारोळा, जवखेडा बु, जवखेडा खुर्द, नादरपूर, पिंपरखेडा, गौरपिंप्री,मोहाडी परिसरात उन्हाळी बाजरी पीक व मक्का मोठ्या प्रमाणात घेतल्या जाते. शिवाय या भागातील शेतकऱ्यांनी विविध जातीच्या आंब्यांच्या झाडांचीही लागवड बऱ्यापैकी केली आहे.या झाडांना यावर्षी मोठ्या प्रमाणात कैऱ्या लागल्या. या पार्श्वभूमीवर या भागात गेल्या आठवडाभरापासून वादळी

वाऱ्यासह जोरदार अवकाळी पाऊस होत आहे. या पावसाने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. शेतात शेतकऱ्यांनी मक्का सोगुन ठेवली असताना सतत पाऊस आल्याने ही मक्का उगत आहेत शासनाने या शेतकऱ्यांची दखल घेऊन पंचनामे करण्यात यावे अशी मागणी परिसरातील शेतकरी करत आहे.

# उपकोषागार यांची तात्काळ बदली करण्याची मागणी,तहसीलदार यांना निवेदन..



**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी** / खुलताबाद तालुक्यातील कोषागार कार्यालयातील उपकोषागार म्हणून कार्यरत असलेले राहुल मगरे यांची तात्काळ बदली करण्याची मागणी मंगळवारी (दि.२७) एका निवेदनाद्वारे तहसीलदार स्वरुप कंकाळ यांच्याकडे करण्यात आली.या बाबत दिलेल्या निवेदनातील तपशील असा, उपकोषागार मगरे यांच्याकडे ग्रामीण रुग्णालयातील प्रयोगशाळा सहाय्यक पदी असलेले के.टी.शेळके यांचे देयक प्रलंबित असून,शेळके कर्करोगग्रस्त आहे,या बाबत त्यांचे देयक लवकरात लवकर निकाली काढा असे सांगण्यास गेलेल्या शिष्टमंडळाच उपकोषागार रोकडे यांनी उध्दटभाषा वापरली.उपकोषागार कार्यालयात तालुक्यातील असंख्य शासकीय कर्मचाऱ्यांची देयके प्रलंबित असून, मगरे हे मनमानी पणे कारभार करीत असून,त्यांची तात्काळ बदली करावी.सदरील निवेदन देते वेळी माजी उपसभापती दिनेश अंभोरे,जेष्ठ नागरिक दत्तू फुलारे, फकीरराव भालेराव वसंत शिरसाट संतोष घुसिंगे.सुरेश यांचे सह आद्दी कार्यकर्ते उपस्थित होते.

# सत्ताधारी पक्षाच्या पदाधिकाऱ्यांना करावे लागते प्रशासनाविरुद्ध आत्मक्लेष आंदोलन..



**आत्ताच एक्सप्रेस**
**कन्नड प्रतिनिधी/ उदय कुलकर्णी**/ महाराष्ट्र रोजगार हमी योजनेतर्गत मंजूर वैयक्तिक लाभांच्या योजनेचा कामे पूर्ण करूनही पं.स.कार्यालयाचे अंतर्गत मिळणारा अनुदान निधी वितरित होत नसले मुळे सत्ताधारी भाजपा पक्षाचे वतीने पं.स.कन्नड कार्यालया समोर आत्मक्लेष आंदोलन करावे लागले आहे.

महाराष्ट्र रोजगार हमी योजना तसेच पी.एम.आवास योजने अंतर्गत कन्नड तालुक्यातील अनेक गोर गरीब शेतकरी यांना वैयक्तिक लाभपोटी शासनाने सिंचन विहिरी,शेत तळे, वृक्ष लागवड,गाय गोठे,शेततळे सह निवाऱ्यासाठी पी.एम. घरकुल योजने अंतर्गत मंजुरी मिळाली होती.सदर मंजुरी नुसार त्यातील ८०% टक्के लाभार्थ्यांनी आपआपली कामे १००%पूर्ण केली.सदर कामे पूर्ण करणेसाठी लाभार्थ्यांनी सावकार,पाहुणे,नातेवाईक किंवा घरातील कुडूक मुडूक मोडून

कामे पूर्ण केली.पण प्रतीक्षा करूनही पं.समिती कार्यालया कडुन त्यांचे बँक खात्यावर पुढील अनुदानची रक्कमच वर्ग होत नसले मुळे सर्व लाभार्थी मोठ्या वैयक्तिक संकटात सापडल्याचे दिसून येताच भाजपा पक्षाचे उप जिल्हाध्यक्ष सुभाष काळे व पक्षाचे अनेक पदाधिकारी यांचे वतीने पं.स.गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे यांना दि.१६ रोजी एक निवेदन देऊन सदर रखडलेला निधी तात्काळ लाभार्थ्यांना कुठलीही चिरीमिरी न करिता वितरित करावा अशी मागणी केली होती.परंतु त्या मागणीकडे दुर्लक्ष झाल्याचे दिसून येताच त्यांनी सोमवार दि.२६ रोजी कार्यालयासमोरच अर्ध नग्न होऊन व स्वतःच्या अंगावर च्याबकांचे फटकारे मारून आत्मक्लेष आंदोलन केले.या बाबत गटविकास अधिकारी चंद्रहार ढोकणे यांनी तात्काळ चक्रे फिरवून आंदोलनकर्त्यांची भेट घेतली. व लेखी आश्वासन देऊन तात्काळ निधी वितरित करण्याचे आश्वासन दिले. व आंदोलनकर्त्यांचे आंदोलन शांत केले.

# दहा दिवसांचे आश्वासन ठरले फसवे, माहितीअभावी पुन्हा अमरण उपोषणाची ठिणगी

## खिर्डीतील विकासकामांवर प्रश्नचिन्ह, पंचायत समिती कार्यालयासमोर पुन्हा उपोषण सुरु



**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी** / खुलताबाद तालुक्यातील मौजे खिर्डी येथील दलित वस्तीतील विकासकामांची माहिती मिळावी या मागणीसाठी संदीप मुनवर व सोमिनाथ निकळजे यांनी मंगळवार, दिनांक २७ मे २०२५ पासून पंचायत समिती कार्यालय,खुलताबाद येथे अमरण उपोषणास पुन्हा सुरुवात केली आहे.सुमारे पंधरा दिवसांपूर्वी याच मागणीसाठी उपोषण करण्यात आले होते. त्यावेळी प्रशासनाने दहा दिवसांच्या आत समिती गठीत करून कामाची संपूर्ण माहिती अहवालासह दिली जाईल, असे लेखी आश्वासन दिले होते. मात्र, त्यानंतरही अद्याप कोणतीही माहिती देण्यात आलेली नाही. त्यामुळे अखेर उपोषणकर्त्यांनी पुन्हा आंदोलनाचा मार्ग अवलंबला आहे.

उपोषणकर्त्यांचा आरोप आहे की, ग्रामविकास अधिकारी जयश्री पुलकंठवार, कनिष्ठ अभियंता संतोष कुकलारे आणि कृषी विस्तार अधिकारी मयूर पाटील यांनी कामामध्ये दिरंगाई व कसूर केली असून,यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करून निलंबित करण्यात यावे.या आंदोलनामुळे खिर्डी सह शहर परिसरात चांगलीच खळबळ उडाली असून, शेतकरी आणि ग्रामस्थ याकडे मोठ्या अपेक्षेने पाहत आहेत. प्रशासनाकडून अद्याप कोणती ही ठोस कारवाई झालेली नसल्याने आंदोलनकर्त्यांच्या भूमिकेने अधिक गांभीर्य प्राप्त झाले आहे. प्रशासनाने या गंभीर प्रकरणाची तातडीने दखल घेऊन मागणी प्रमाणे कारवाई करावी, अशी मागणी खिर्डीचे माजी सरपंच कृष्णा चव्हाण यांनी केली आहे.

# म्हैसमाळ तलावात आढळला ३३ वर्षीय इसमाचा मृतदेह,खुलताबाद पोलिसांत आकस्मिक मृत्युची नोंद



**आत्ताच एक्सप्रेस**
**खुलताबाद प्रतिनिधी** / खुलताबाद-तालुक्यातील म्हैसमाळ येथील तलावात सोमवारी (दि.२६) एका इसमाचा मृतदेह आढळून आल्याने परिसरात खळबळ उडाली होती मृताचे नांव संदिप नामदेव हिवराळे (वय ३३ ,रा.संजयनगर,मुकुंदवाडी, औरंगाबाद ) असे असून त्याचा बुडून मृत्यू झाल्याची प्राथमिक माहिती आहे.या घटनेची माहिती पोलीस पाटील संजय जाधव यांनी दिल्यानंतर तातडीने अग्निशमन विभागाला पाचारण करण्यात आले. अग्निशमन पथकाने घटनास्थळी धाव घेत संदिप हिवराळे याचा मृतदेह तलावाबाहेर काढला आणि त्यास उपचारासाठी ग्रामीण रुग्णालय,खुलताबाद येथे हलविण्यात आले. मात्र,वैद्यकीय अधिकाऱ्यांनी त्याला तपासून मृत घोषित केले.याबाबत खुलताबाद पोलिस ठाण्यात आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली असून या घटनांची तपास पोलीस निरीक्षक धनंजय फराटे यांच्या मार्गदर्शनाखाली

पुढील तपास पोलीस अंमलदार उत्तम खटके हे करीत आहेत.

### महिला सक्षमीकरणासाठी उज्वल सेवाभावी संस्थेचा पुढाकार; हिरकणी पुरस्काराने कर्तबगार महिलांचा गौरव

# शिक्षणाचे महत्व समजले तर भविष्य उज्वल होईल-जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/** तरुणांनी ध्येय प्राप्तीसाठी डोळ्यासमोर टार्गेट ठेवले पाहिजे. त्याशिवाय कोणतेच यश गाठता येत नाही. त्यासाठी प्रत्येकाला शिक्षणाचे महत्व कळाले पाहिजे तरच भविष्य उज्वल होईल असे प्रतिपादन जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी केले.

जालना शहरातील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सभागृहात दि. २६ मे २०२५ रोजी उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या वतीने महिला सक्षमीकरण अभियान अंतर्गत हिरकणी महोत्सव आयोजित केले होते. यावेळी उद्घाटक म्हणून जिल्हाधिकारी बोलत होते. दरम्यान व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. राजकुमार म्हस्के, प्रमुख पाहुणे म्हणून जालना शहर महानगरपालिकेचे आयुक्त संतोष खांडेकर, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, पोलीस निरीक्षक सिध्दार्थ माने, शाहीर अप्पासाहेब उगले, छत्रपती शिवाजी महाराज विद्यापिठाचे प्रा. बापूराव बनसोडे, संस्थेच्या अध्यक्षा सौ. करुणा अच्युत मोरे यांची उपस्थिती होती.

राज्यातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणार्या आणि सामाजिक उपक्रमात सहभाग घेणार्या कर्तबगार महिलांचा हिरकणी पुरस्काराने गौरव करण्यात आला. राज्यातील शाळकरी मुली आणि महिलावर होणारे बालात्कार आणि छेडछाडीच्या घटनांना प्रतिबंध करण्यासाठी हिरकणी सुरक्षा अभियान सुरु करण्यात आले असून त्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी मोफत ड्रायव्हिंग आणि स्वसंरक्षण प्रशिक्षणासाठी लाभार्थी महिला आणि मुलीची लक्की ड्रा पध्दतीने निवड करण्यात आली. तत्पुर्वी उपस्थित महिलांना दामिनी पथकाच्या टीमकडून स्वसंरक्षण आणि निर्भीडपणे अन्यायाविरोधात न्याय मागण्यासाठी पुढे येण्याचे आवाहन केले. त्यानंतर महिला व बाल कल्याण विभागाच्या अंतर्गत महिलांसाठी सुरु असलेल्या वन स्टॉप सेंटरच्या प्रकल्प प्रमुख वनिता पिंपळे यांनी अत्याचार पिडीत किंवा अडचणीच्या काळता महिलांसाठी असलेल्या योजनेची माहिती दिली. तसेच महिला व बाल कल्याण विभागाचे इंगळे यांनी एकल पालकत्व, लेक लाडकी, बाल संगोपन यासह विविध योजनेची माहिती देत अर्जही उपलब्ध करुन दिले. तर पोलीस अधिक्षक कार्यालयाकडून स्थानिक गुन्हे शाखेचे संजय सोणवने यांनी मुलींना स्वसंरक्षण, सायबर सुरक्षा आणि महिला सुरक्षेच्या संदर्भात मार्गदर्शन केले. त्यानंतर महिलांसाठी आयोजित केलेल्या होम मिनीस्टर कार्यक्रमात महिलांनी पैठणी, चांदीचं नाणं, रोख रक्कम असे विविध बक्षिसं जिंकून आनंदोत्सव साजरा केला. तर शाहीर रामानंद उगले यांचा सांस्कृतीक कार्यक्रम पार पडला.

दरम्यान जिल्हाधिकारी यांनी आपल्या भाषणातून महिला सक्षमीकरणाच्या संदर्भात मार्गदर्शन केले. मराठवाड्यात महिला सक्षमीकरणाची अत्यंत गरज असून अनेकांच्या मानसीकतेत बदल करण्यात गजर आहे. आणि त्या दृष्टीने उज्वल बहुउद्देशीय सेवाभावी संस्था सक्रीयपणे काम करत आहे. मराठवाड्यात महिलांच्या बाबतीत कमी असलेले लिंग गुणोत्तर, मुलीचे शिक्षण, लग्नाचे वय, मुलीचे घरातील तसेच समाजातील स्थान, काम करण्याच्या ठिकाणचे स्थान, प्रॉपर्टीमध्ये स्थान यावर काम झाले पाहिजे. सामाजिक विचार करुन महिला आपल्या प्रॉपर्टीवरील हक्क सोडून देतात.परंतु, तीने जर प्रॉपर्टी मागीतली तर घरात वाद सुरु होतात. दोन मुला-मुलीतील भेदही पहायला मिळतात, कुणाला कीती शिकवायचे हे त्या कुटुंबाच्या मानसीकतेवर अवलंबून असते. मुलीला काहीहीही शिक्षण भेटले तरी छान म्हणून पुढे घेऊन जा-तात. मात्र मुलाच्या अनुषंगाने त्याला हवं ते जोपर्यंत भेटत नाही, तोपर्यंत रिपीट प्रयत्न करायला सांगता.

त्याच्यासाठी घर गहान ठेवण्याची तयारी देखील असते. त्यामुळे त्यांच्या मानसिकता बदलन्यासाठी शासन प्रयत्न करीत असले तरी त्यात संस्थांचा महत्वाचा रोल आहे. असेही जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांनी सांगितले.








#### मुली आणि महिलांना मोफत स्वसंरक्षण व चारचाकी वाहन प्रशिक्षण

या हिरकणी सुरक्षा अभियानाच्या माध्यमातून मुली आणि महिलांना स्वसंरक्षणाचे धडे दिले जाणार असून लोकसहभागाच्या माध्यमातून १०० मुलींना मोफत ड्रायव्हिंग प्रशिक्षण देऊन महिला वाहनचालक तयार करण्याचे काम हाती घेण्यात आले आहे. त्याचा शुभारंभ जिल्हाधिकारी डॉ. श्रीकृष्ण पांचाळ यांच्या हस्ते चिठ्ठी काढून लक्की ड्रॉ पध्दतीने सुरु करण्यात आला आहे. यावेळी चिठ्ठी काढून काही मुलींची चारचाकी वाहनचालक प्रशिक्षणासाठी मुलींची निवड करण्यात आली. शाळकरी मुलीवर आणि टॅक्सी चालकाकडून महिलावर होणारे बालात्कार कमी करण्यासाठी महिला ड्रायव्हर घडविण्यात येत आहेत. त्यासाठी मुलींना आणि महिलांना मोफत चारचाकी वाहन प्रशिक्षण देऊन त्यांना स्वसंरक्षाणाचे प्रशिक्षणही देण्यात येत आहे.

## जालना जिल्ह्यातील पिक विमा योजनेत स्थानिक नैसर्गिक आपत्ती हा घटक समाविष्ट करा, शेतकऱ्यांचं जिल्हाधिकाऱ्यांना निवेदन...

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/ बबनराव वाघ** / दिनांक २६ सोमवार रोजी दुपारी चार वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना जिल्ह्यातील पिक विमा योजनेत स्थानिक नैसर्गिक आपत्ती हा घटक समाविष्ट करा अशी मागणी जालन्यातील शेतकऱ्यांनी केलीय. जालन्याच्या घनसावंगी तालुक्यातील राजेगाव येथील शेतकऱ्यांनी आज जालना जिल्हाधिकाऱ्यांची भेट घेऊन त्यांना आपल्या मागण्यांच निवेदन सादर केलं. वर्ष - २०२४ मध्ये जालना जिल्ह्यातील काही भागांत अतिवृष्टी झाली होती. या अतिवृष्टीग्रस्त शेतकऱ्यांना अद्यापही शासनाकडून मदत




मिळालेली नाहीये. त्यामुळे अतिवृष्टी मदतीपासून वंचित राहिलेल्या सर्व शेतकऱ्यांना तातडीने मदत देण्यात यावी. तसेच वर्ष - २०२४ मधील फळपीक विमा शेतकऱ्यांना वाटप करावा यासह इतर विविध मागण्यांचे निवेदन यावेळी शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिलंय. दरम्यान, शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांसंदर्भात ३० मे रोजी जालन्यात शेतकऱ्यांची भव्य रॅली काढण्यात येणार असल्याची माहिती शेतकरी गजानन उगले यांनी दिलीय. यावेळी गजानन उगले,गजानन देवडकर,गणेश उगले, अरुण बुरकुल, नारायण खोजे,संभाजी ढेंबरे, शितल बारोटे,संतोष जाधव इत्यादी शेतकरी बांधवांची उपस्थित होते..

### समाजसेवेच्या आदर्शांचा गौरव - अहिल्यादेवी होळकर ३०० वी जयंतीनिमित्त जनजागृती उपक्रम

## समाजसेवेच्या आदर्शाची आठवण, अहिल्यादेवी होळकर जयंतीनिमित्त जिल्हाभरात जनजागृती कार्यक्रम - जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/** मराठवाड्याच्या भूमीवर गौरवशाली इतिहासाची साक्ष देणाऱ्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त जालना जिल्ह्यात २१ मे ते ३१ मे २०२५ दरम्यान विविध सामाजिक, सांस्कृतिक आणि धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. या जयंती महोत्सवात संपूर्ण जिल्हाभरात लोकसहभाग वाढवण्यासाठी आणि अहिल्यादेवींच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सर्वांनी कार्यक्रमात सहभावी व्हावे असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे यांनी केले आहे.

* यामध्ये निबंध व रांगोळी स्पर्धा दिनांक: २८ मे २०२५ रोजी दुपारी ३ ते ५ दरम्यान बालाजी मंदिर, कचेरी रोड येथे असणार आहे, सहभागासाठी सौ. संध्याताई देठे ९४२२२६९५५५, सौ.शुभांगीताई देशपांडे ९०२१३३७२८६, सौ.अरुणाताई जाधव ८९९९७३४८३४ यांच्याशी संपर्क करावा.

* मंदिर स्वच्छता, महाआरती, वेदपठन व भक्तिगीत दिनांक: २२ ते २९ मे रोजी श्रीराम मंदिर, पलंगबावडी, पाहेगाव, जुना जालना या ठिकाणी करण्यात येणार आहे.

* नाटक, पथनाट्य, चित्ररथ प्रदर्शन हे दिनांक: २८ मे सकाळी १०.०० वा सावरकर चौक, गांधी चमन चौक येथे होणार आहे.

* महिला मेळावा (अहिल्यादेवी वेशभूषेत मिरवणूक) दिनांक: ३१ मे रोजी सकाळी १०.०० वा अमृतेश्वर महादेव मंदिर ते बालाजी मंदिर दरम्यान करण्यात येणार आहे.

* महिला मॅरॅथॉन दिनांक: ३१ मे सकाळी ६.०० वा छत्रपती शिवाजी महाराज चौक येथून होणार आहे.

* बुद्धिजीवी संमेलन दिनांक: ३१ मे रोजी सायं. ५.०० वा भाजपा जिल्हा कार्यालय, जालना येथे होणार आहे.

या कार्यक्रमांच्या माध्यमातून पुण्यश्लोक अहिल्यादेवींनी आपल्या जीवनकार्याद्वारे समाजास दिलेल्या मूल्यांचा जागर करण्यात येणार आहे.

या सर्व कार्यक्रमांमध्ये नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवून ऐतिहासिक जयंती महोत्सवात योगदान द्यावे, असे आवाहन सौ. संध्याताई देठे, सौ. शुभांगीताई देशपांडे, सौ. अरुणाताई जाधव, श्री. कपिल दहेकर, श्री. तुलजेश चौधरी, श्री. सुनिल खरे, श्री. महेश निकम, श्री. संजय डोंगरे, श्री. अमोल धानुरे, श्री. कृष्णा गायके, श्री. कृष्णा लिंगसे श्री. कैलास सचदेव, सौ. रश्मी टेकवाणी, सौ. रेखा टेकवाणी, श्री. सतीशचंद्र प्रभू, श्री. विकास कदम, श्री. मनोज बिडकर आयोजकांतर्फे करण्यात आले आहे.

# उत्कर्ष नगर भागात पाईप लाईन उपलब्ध करून द्या- रा.कॉ.महिला आघाडीची मागणी

### आगामी तीन महिन्यात काम पूर्ण करून पाण्याचा प्रश्न निकाली काढण्यात येईल असे आश्वासन सहाय्यक आयुक्त केशव कानपुडे यांनी यावेळी दिले

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/** शहरातील उत्कर्ष नगर भागात पिण्याच्या पाण्यासाठी पाईप लाईन नसल्याने नागरिकांना विकतच्या पाण्यावर अवलंबून राहावे लागत असल्याने सदरील भागात पाईप लाईन उपलब्ध करून द्या अन्यथा ११ जून पासून महानगरपालिके समोर महिलांच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल असा इशारा राष्ट्रवादी महिला आघाडीच्या शहर शाखेच्या वतीने मनपा आयुक्त यांना दिलेल्या निवेदनात दिला आहे.

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे जिल्हाध्यक्ष अरविंद चव्हाण यांच्या मार्गदर्शन खाली आज शहर अध्यक्ष रिंकल तायड व मनकर्णा डांगे यांच्या नेतृत्वात उत्कर्ष नगर भागातील महिलांनी महानगर पालिका आयुक्त यांना मागण्याचे निवेदन दिले.त्यामध्ये भागातील पाण्याच्या गंभीर समस्येचा उल्लेख आहे.वार्ड मधील सर्व पाण्याचे सोर्स मधून ४०००पेक्षा जास्त क्षार युक्त पाणी येत असल्यामुळे ते पीता येत नाही, परिणामी नागरिकांना पिण्यासाठी व अंघोळीसाठी विकतचे पाणी घ्यावे लागते . शहरातील हा भाग असूनही या कडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत आहे. त्या मुळे या भागात कावीळ , डायरिया,केशगळती या सारखे रोग उदभवत आहेत. त्यामुळे लोकांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे.

महानगरपालिकेला या पूर्वी पण निवेदनाद्वारे सदरील प्रश्न सोडविण्याबाबत विनंती केली होती .परंतु आपण अद्याप कोणतीही कार्यवाही केली नाही हि गंभीर बाब आहे. या भागातील पाण्याची जैविक व अजैविक तपासणी करण्यात यावी तसेच या भागातील पिण्याच्या पाण्याची समस्या दूर करण्यासाठी पाईप लाईन उपलब्ध करून द्यावी , अन्यथा राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष , महिला आघाडीच्या वतीने दिनांक १० जून २०२५ पासून मनपा समोर महिलांच्या वतीने आमरण उपोषण करण्यात येईल , अशा इशारा निवेदनाद्वारे दिला आहे. निवेदनावर शहरअध्यक्ष रिंकल तायड, माजी नगर सेविका मनकर्णा डांगे, उपाध्यक्ष संगीता रोकडे, वार्ड अध्यक्ष पुष्पाताई राऊत , मीरा हांडे , शोभाताई डॉ . रेणुका खेडेकर,नागे,तेजस्वीनी बुंदेले, अंजली पिसे, मीराताई खरात ,शोभाताई प्रेमभारती , बेबीताई त्रिवेदी, नीता जाधव, वर्षाताई ठोंबरे , दिपालीताई वानखेडे, सुजाता औटे, लक्ष्मीताई केशापुरे, मनीषाताई केशापुरे, शारदा गोकुलवार, मीरा मोहिते, अश्विनी चित्राल, यांच्या सह अनेक महिलाची मोठ्या संख्येने उपस्थित होते. .



## अडीच तासाच्या अथक परिश्रमानंतर मोती तलावात बुडालेल्या दोन भावंडाचे मृतदेह सापडले..


**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/** दिनांक २६ सोमवार रोजी दुपारी चार वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालन्यातील मोती तलावामध्ये जुनेद आसेफ सय्यद वय १९ आणि आयान आसेफ सय्यद वय १५ हे दोन सख्ख्या भावंडाचा मोती तलावातील पाण्यामध्ये बुडून मृत्यू झाला होता.

यावेळी स्थानिक नागरिकांसह अग्निशमन दलाचे जवानांनी बोटच्या साह्याने गळ टाकून दोन्ही मुलांचा मृतदेह शोधण्यासाठी अथक प्रयत्न केले. तब्बल अडीच तास त्यांच्या मृतदेहाची शोध मोहीम सुरू होती.

चंदनझीरा पोलीस, अग्निशमन दलाचे पथक आणि स्थानिक नागरिकांच्या मदतीने अडीच तासाच्या अथक प्रयत्नानंतर दोन्ही

**✱ चंदनझीरा पोलिसांनी दोघांचे मृतदेह घेतले ताब्यात**
**✱ पंचनामा करून दोन्ही मृतदेहांना शासकीय सामान्य रुग्णालयामध्ये शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले..**





मृतदेह पाण्यातून बाहेर काढण्यात आले असून दोन्ही मृतदेह चंदनझीरा पोलिसांनी ताब्यात घेतले असून घटनास्थळाचा पंचनामा करून दोन्ही मृतदेहांना शहरातील शासकीय सामान्य रुग्णालयामध्ये शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आले आहे.

पुढील तपास चंदनझीरा पोलीस करत आहेत.

## अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती उत्सव समितीची हाटेल सात्वीक भोज येथे पत्रकार परिषद संपन्न

**आत्ताच एक्सप्रेस**
**जालना प्रतिनिधी/** पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंतीनिमित्त जालन्यात ३० मे रोजी विविध कार्यक्रमांच आयोजन करण्यात आलंय. ३० मे २०२५ रोजी अहिल्यादेवी होळकर यांची ३०० वी जयंती साजरी होणार आहे. त्यानिमित्त अहिल्यादेवी होळकर यांना अभिवादन करण्यासाठी विविध कार्यक्रम आयोजित करण्यात आलेत. ३० मे रोजी सकाळी ९ वाजता अहिल्यादेवी होळकर यांना पारंपरिक वेशभूषा करून तसेच पारंपारिक वाद्यसह अभिवादन करण्यात येणार आहे. तसेच सकाळी १० वाजता शहरातून भव्य मोटरसायकल रॅली काढली जाणार आहे. सदरील मोटरसायकल रॅली राजमाता अहिल्यादेवी स्मारक अंबड चौफुली पासून संपूर्ण शहरांमधून निघणार आहे यामध्ये ५०० मोटरसायकल असणार आहेत रॅली मार्गांमध्ये येणाऱ्या सर्व महापुरुषांच्या प्रतिमेस अभिवादन करण्यात येणार आहे. दुपारी बारा वाजता मिठाई आणि महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. शिवाय सायंकाळी ५:३० वाजता संगीतांचा आणि स्टँडींग डि.जे.शो कार्यक्रम आयोजित करण्यात आला आहे. अशी माहिती अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती उत्सव समितीच्या वतीने आज दि.२६ सोमवार रोजी सकाळी बारा वा. च्या सुमारास हाटेल सात्वीक भोज येथे आयोजित पत्रकार परिषदेत देण्यात आली आहे. यावेळी पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर त्रिशताब्दी जयंती उत्सव समितीचे जिल्हाध्यक्ष शिवप्रकाश चितळकर, उपाध्यक्ष पांडुरंग कोल्हे, सचिव कैलास चोरमारे, स्वागताध्यक्ष नितीन कानडे, सहसचिव रामराव कोल्हे, कोषाध्यक्ष जनार्दन जारे तसेच शहर कार्यकारिणीचे अध्यक्ष दीपक डोळझाके, उपाध्यक्ष रोहित सुर्ण, सचिव राम जोशी, स्वागत अध्यक्ष कृष्णा गायके, कोषाध्यक्ष ओम काळे यांच्यासहित इतरांची उपस्थिती होती.



हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंढे यांनी निरंकारजी प्रिंट अॅण्ड पब्लिकेशन, पी-३०/०/२,गुलमोहर कॉलनी,एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र), येथे छापून पी-३०/०/२, गुलमोहर कॉलनी, एन-५, सिडको, छत्रपती संभाजीनगर-४३१००३ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
मुख्यकार्यालय-०२४०-२४७४८१३, संपादक-सुग्रीव सोपानराव मुंढे मो.९४२१२८१०७८ , RNI.No.MAH/MAR2011/39247
The Printer, Owner & Publisher **Sugriv Sopanrao Mundhe** Print at Nirankarji Print & Publication, P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003 (M.H.) Published at P-30/0/2, Gulmohar Colony, N-5 CIDCO, Chhatrapati Sambhajinagar -431003. (**Editor - Sugriv Sopanrao Mundhe**) Office Ph. : 0240-2474813